नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज़
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २१ | Issue - 21 | वार शनिवार दि. ७ जून २०२५ | Blow- Saturday Date 7 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## पीएम मोदींच्या हस्ते जगातील सर्वात उंच काश्मीर खोऱ्यातील चिनाब ब्रीजवर फडकला तिरंगा

### चिनाब ब्रिज आणि देशातील पहिला केबल-स्टेड रेल्वे ब्रिज अंजी ब्रिजला भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जम्मू : काश्मीरला देशाच्या इतर भागाशी जोडणारी पहिली वंदे भारत एक्स्प्रेस आज (६ जून) कटरा स्टेशनवरून धावली. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्याहस्ते कटरा येथे या ट्रेनला हिरवा झेंडा दाखवण्यात आला.

जगातील सर्वात उंच रेल्वे आर्च ब्रिजवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तिरंगा फडकावत आनंद व्यक्त केला. चिनाब ब्रिज आणि देशातील पहिला केबल-स्टेड रेल्वे ब्रिज अंजी ब्रिजला भेट देत मोदींच्याहस्ते या ब्रीजचे लोकार्पण झाले. पंतप्रधान मोदींच्याहस्ते ४६ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या इतर विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटनही यावेळी करण्यात आले. कटरा स्टेडियममध्ये मोदींनी जाहीर सभेला संबोधितही केले. उत्तर रेल्वेच्या कटरा-श्रीनगर मार्गावर ७ जूनपासून वंदे भारत ट्रेन सेवा सुरू करणार असून आयआरसीटीसी वेबसाइटवर तिकीट बुकिंग करता येईल. कटरा आणि श्रीनगर दरम्यान आठवड्यातून सहा दिवस दोन गाड्या धावतील. उत्तर रेल्वेने सांगितले की, या ट्रेनमध्ये दोन प्रवास वर्ग आहेत. चेअर कारचे भाडे ७१५ रुपये आणि एक्झिक्युटिव्ह क्लासचे भाडे १३२० रुपये आहे. सध्या या गाड्या फक्त बनिहाल येथे थांबतील, इतर थांब्यांचा निर्णय नंतर घेतला जाईल.

स्वातंत्र्याच्या ७६ वर्षांनंतरही, हिमवर्षावाच्या काळात काश्मीर खोरे देशाच्या इतर भागांपासून तुटलेले असते. हिमवर्षावाच्या वेळी राष्ट्रीय महामार्ग-४४ बंद असल्याने काश्मीर खोऱ्यातील प्रवेश देखील बंद असतो.

बर्फवृष्टी होत असताना जम्मू ते काश्मीर रस्त्याने प्रवास करण्यासाठी ८ ते १० तास लागायचे. पण, आता वंदे भारत ट्रेन सुरू झाल्यानंतर, हा प्रवास केवळ तीन तासांत पूर्ण होईल. कटरा-श्रीनगर ट्रेन ही वर्षभर काश्मीरला रेल्वेने जोडण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा पहिला टप्पा आहे. पुढील टप्प्यात, नवी दिल्लीहून श्रीनगरमार्गे जम्मूपर्यंत वंदे भारतसह इतर गाड्या चालवण्याची योजना आहे. नवी दिल्ली-श्रीनगर वंदे भारत एक्सप्रेस या वर्षी ऑगस्ट किंवा सप्टेंबरमध्ये सुरू होणार आहे. तथापि, एकही ट्रेन नवी दिल्लीहून श्रीनगरला थेट जाणार नाही. दरम्यान, काश्मीर खोऱ्याला वर्षभर रेल्वेद्वारे देशाच्या इतर भागाशी जोडले ठेवण्यासाठी १९९७ मध्ये यूएसबीआरएल प्रकल्प सुरू करण्यात आला. तो पूर्ण होण्यासाठी २८ वर्षांहून अधिक काळ लागला.

## सिंधू नदीचे पाणी रोखताच पाकिस्तानने गुडघे टेकले, एकामागून एक पत्र पाठवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सिंधू जल करार स्थगितीच्या निर्णयावरुन पाकिस्तानच्या अडचणी कमी होताना दिसत नाहीत. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधू पाणी करार स्थगित केला आहे. त्यानंतर पाकिस्तान भारताकडे निर्णयावर पुर्नविचार करण्याची सतत विनंती करत आहे.



पाकिस्तानने भारताला चार पत्रे लिहून या पुनर्विचार करण्याची विनंती केली आहे. दुसरीकडे, भारताने जल करार स्थगित करण्याच्या निर्णयामागे सीमेवरील दहशतवादाचे कारण असल्याचे म्हटले आहे. तसेच, जलप्रकल्पांबाबतही काही तांत्रिक आक्षेप आहेत. या सर्व मुद्द्यांमुळे दोन्ही देशांमधील संबंध आणखी बिघडले आहेत.

वृत्तानुसार, पाकिस्तानने भारताला चार पत्रे पाठवली आहेत. ही पत्रे पाकिस्तानच्या जल मंत्रालयाचे सचिव सय्यद अली मुर्तजा यांनी पाठवली आहेत. यापैकी तीन पत्रे ऑपरेशन सिंदूर नंतर पाठवण्यात आली आहेत.

पहिले पत्र मे महिन्याच्या सुरुवातीला 'ऑपरेशन सिंदूर' सुरू होण्यापूर्वी पाठवण्यात आले होते. त्यानंतर, मुर्तजा यांनी आणखी तीन पत्रे पाठवली आहेत.

सूत्रांच्या हवाल्याने म्हटले की, 'सर्व पत्रे जलशक्ती मंत्रालयामार्फत परराष्ट्र मंत्रालयाला पाठवण्यात आली आहेत.'

२२ एप्रिलला पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, भारताच्या जलशक्ती मंत्रालयाच्या सचिव देबाश्री मुखर्जी यांनी पाकिस्तानच्या जल मंत्रालयाचे सचिव सय्यद अली मुर्तजा यांना एक पत्र लिहिले होते. पत्रात भारताने स्पष्ट केले होते की, भारतीय पाकिस्तानकडून सीमेवर होणाऱ्या दहशतवादी कारवायांना बळी पडत आहे.

हे लक्षात घेऊन, भारताने सिंधू पाणी करारातील आपला सहभाग स्थगित करण्याचा निर्णय घेतला. 'पाकिस्तानने १९६० च्या कराराची मूलभूत भावना, म्हणजेच परस्पर विश्वास आणि सहकार्य कमकुवत केले आहे,' अशी भूमिका भारताची आहे.

## ठाकरे बंधू एकत्र येणार? उद्धव ठाकरेंचे स्पष्ट संकेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार अशा पद्धतीची चर्चा जोर धरू लागली आहे. त्यातच, आधी शिवसेना खासदार संजय राऊत यांनी, तर उद्धव ठाकरे यांनी देखील युतीचे स्पष्ट संकेत दिले आहेत. त्यानंतर मुंबईसह कोल्हापुरातील शिवसैनिक आणि मनसैनिक यांना अत्यंत आनंद झाला आहे. हे दोन्ही बंधू एकत्र येणे ही महाराष्ट्राची गरज आहे. महाराष्ट्रातील बाळासाहेबांच्या सैनिकांची इच्छा आहे हे दोन्ही बंधू एकत्र यावेत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आल्यास इतर पक्षांची चांगलीच अडचण होऊ शकते. ठाकरे हा ब्रँड काय आहे, हे महाराष्ट्राला दिसून येईल अशा शब्दात शिवसैनिक आणि मनसैनिक मनातील इच्छा बोलून दाखवत आहेत. महाराष्ट्राच्या मनात जे आहे, तेच होईल, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले. त्यावर, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही हात जोडत, आम्ही महायुती म्हणून निवडणूक लढू आणि जिंकू असे म्हटले.

उद्धव ठाकरेंनी शिवसेना-मनसे एकत्र येण्यासंदर्भात केलेल्या वक्तव्यावरुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर बोलताना फडणवीस म्हणाले की, त्यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया हे



राज ठाकरे देतील, मी कशी प्रतिक्रिया देणारं, माझा काय संबंध येतो. यांनी साथ द्यायची आणि त्यांनी प्रतिसाद द्यायचा की नाही. आता तुम्हीच जास्त तारे तोडून राहिला, त्या दोघांपेक्षा जास्त माहिती तुमच्याकडे आहे हा सगळ्यात मोठा प्रॉब्लेम आहे. पण, काही हरकत नाही मला असं वाटतं की माध्यमांचं ते कामच आहे. आता तरी त्याच्यावर प्रतिक्रिया द्यायला काय आहे, असं मला वाटत नसल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. तुम्हाला माहिती आहे ना, मी माझा राजकीय अनुभव असा वारंवार सांगत नसतो, तो उचित वेळी मी सांगत असतो असेही फडणवीसांनी म्हटलं.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले तर काय होईल, 'सब कुछ लुटा कर मिला तो क्या हुआ' अशी डायलॉगबाजी करत कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या युतीमुळे काय फरक पडणार नसल्याचे मत व्यक्त केलं. मनसे आणि शिवसेना एक होऊ द्या ना, पण लोकं विकास बघतात. नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकास बघतात. त्यामुळे लोक आमच्याबरोबर आहेत. भाजप हा स्वतःला राष्ट्रवादी, राष्ट्रप्रेमी पक्ष म्हणतो, राष्ट्राचे नियम आणि सिद्धांत आहे, त्याप्रमाणे आम्ही चालणार असे उत्तर मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज गडचिरोली पोलिसांच्या सी. सिक्सटी युनिटला रशियन बनावटीचे अत्याधुनिक शस्त्र देण्यात आले आहे. १७२ असॉल्ट रायफल, १९ मशीन पिस्टल आणि भारतीय बनावटीच्या ३०० खास बुलेटप्रूफ जॅकेट्स सी ६० च्या जवानांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. या अत्याधुनिक शस्त्रांमुळे गडचिरोली पोलिसांच्या सर्वात यशस्वी अशा उ-६० युनिटची मार्क क्षमता आणखी वाढणार असून जंगलातील त्यांचे ऑपरेशन्स आणखी अचूक होतील, अशी अपेक्षा आहे.

## पोलिसांनी बनावट कीटकनाशकच्या रॅकेटचा पर्दाफाश केला; मुख्य आरोपीला अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : बनावट कीटकनाशकांच्या रॅकेटमधील प्रमुख आरोपींपैकी राजू चेचानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजेंद्र चेचानी याला तेलंगणा पोलिसांनी एका कारवाईदरम्यान अटक केली. स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांच्या सहकार्याने केलेल्या या कारवाईत पोलिसांनी २ मे २०२५ रोजी राजस्थानातील चित्तोडगड जिल्ह्यातील बस्सी गावातील फार्महाऊसवरून राजू याला अटक केली.

या कारवाईमुळे भारतातील कृषी क्षेत्राला असलेला बनावट कीटकनाशकांचा वाढता धोका उघडकीस आला आहे. या अशा लोकांकडून बनावट कीटकनाशकांच्या माध्यमातून निष्पाप शेतकऱ्यांना वारंवार फसवले जाते. एकदम खऱ्या ब्रँडसारखी पॅक केलेली ही बनावट रसायने शेतीसाठी अत्यंत हानिकारक असतात. त्यांच्या वापरामुळे तसेच त्यातील घातक घटकांमुळे अनेकदा पिकांचे नुकसान होते आणि उत्पादनात घट होते. नुकत्याच झालेल्या या अटकेमुळे अशा प्रकाराला आळा बसेल अशी आशा व्यक्त होते आहे. अनेक राज्यांमध्ये पसरलेल्या बनावट कृषी रसायनांची ही पुरवठा साखळी तुटेल, अशी अपेक्षा आहे.

**जागतिक बँकेकडून कौशल्य विकास विभागाला १२०० कोटी तर केंद्रशासन १०० कोटी निधी देणार**

**कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे निर्देश**


## यावर्षीपासून सर्व शासकीय आयटीआयमध्ये किमान एक नवीन अभ्यासक्रम सुरू करावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : कौशल्य विकास विभाग शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी सहा प्रकारचे न्यू एज कोर्सेस सुरू करत आहे. यापैकी सोलापूर जिल्ह्यातील सर्व १२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी किमान एक नवीन अभ्यासक्रम यावर्षीपासून आपल्या संस्थेत सुरू करावा. मशिनरी व अन्य बाबीसाठी प्रत्येक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला १.२५ कोटीचा निधी विभागामार्फत उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित कौशल्य विकास विभागाच्या जिल्हास्तरीय आढावा बैठकीत श्री. लोढा बोलत होते. यावेळी कौशल विकास विभागाचे मुंबई येथील सहसंचालक अनिल जाधव, पुणे येथील उपसंचालक चंद्रशेखर ढाकणे, उपयुक्त अनुपमा पवार, जिल्हा व्यवसाय प्रशिक्षण अधिकारी सुरेश भालचीम, सहाय्यक आयुक्त संगीता खंदारे, मित्रा संस्थेचे अधिकारी पंकज जयस्वाल यांच्यासह सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य उपस्थित होते.

यावेळी श्री. लोढा म्हणाले की राज्याच्या कौशल्य विकास विभागाला कौशल्य आधारित उपक्रम राबवण्यासाठी जागतिक बँकेकडून बाराशे कोटीचा निधी मिळणार आहे तसेच केंद्र शासनही १०० कोटी रुपये उपलब्ध करून देणार आहे. या विभागाला निधीची कोणत्याही प्रकारची कमतरता नाही. त्यामुळे सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने आपल्या प्रशिक्षण संस्थेत यावर्षीपासून किमान एक नवीन अभ्यासक्रम सुरू करावा. कौशल्य विकासाचे महत्त्व याविषयी जनजागृती करून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांची मोठी गर्दी झाली पाहिजे, या दृष्टीने प्रत्येकाने प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी निर्देशित केले.




**कौशल्य विकास विभागाकडून सोलापूर जिल्ह्यातील १२ शासकीय आयटीआय ला प्रत्येकी १.२५ कोटीचा निधी नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी देणार**

कौशल्य विकास विभागाने न्यू एज कोर्सेसच्या माध्यमातून रोबोटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, थ्रीडी प्रिंटिंग, इलेक्ट्रिक वेहिकल साठी ईव्ही टेक्निशियन, सोलर टेक्निशियन हे कोर्सेस सुरू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. हे सर्व कोर्सेस भविष्याच्या दृष्टीने खूप महत्त्वपूर्ण असून या अंतर्गत प्रशिक्षित होणारा विद्यार्थी रोजगारक्षम होईल याची खात्री आहे. या क्षेत्रात जिल्ह्यातील सर्व शासकीय प्रशिक्षण संस्थांनी आपापले अभ्यासक्रम डिझाईन करावेत.

यासाठी प्रत्येकी १.२५ कोटीचा निधी उपलब्ध करण्यात येईल. यामध्ये ७५ लाख मशिनरी, २५ लाख बांधकामासाठी व २५ लाख फर्निचर व अनुषंगिक साहित्य खरेदी करण्यासाठी वापरता येणार असल्याचे श्री. लोढा यांनी सांगितले. महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व महिला औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत अनुक्रमे सोलार टेक्निशियन व इंटरनेट ऑफ थिंग्स हा नवीन अभ्यासक्रम सुरू करत असल्याबद्दल मंत्री श्री लोढा यांनी समाधान व्यक्त केले तसेच अन्य सर्व प्राचार्यांनी याबाबत प्रयत्न करावेत असे सांगितले. तसेच सोलापूर टेक्स्टाईल हब असल्याने त्यावर आधारित अभ्यासक्रम नियोजित करण्याबाबत सांगितले. प्रत्येक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी असलेल्या आय एम सी चे सदस्य क्रियाशील आहेत का नाही याबाबतची माहिती घेऊन जे अध्यक्ष व सदस्य अक्रियाशील आहेत, त्यांच्या जागेवर नवीन क्रियाशील सदस्यांची नियुक्ती करण्याचे प्रस्ताव त्वरित पाठवण्याचे निर्देश श्री. लोढा यांनी दिले. त्याप्रमाणेच प्रत्येक आयटीआय ने किमान एक रोजगार मेळावा घ्यावा व त्यामध्ये किमान ५० विद्यार्थ्यांना रोजगार मिळाला पाहिजे या दृष्टीने प्रयत्न करण्याबाबत ही सूचित केले. प्रारंभी जिल्हा व्यवसाय प्रशिक्षण अधिकारी सुरेश भालचिंग यांनी सोलापूर जिल्ह्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सुरू असलेल्या कोर्सेस ची माहिती दिली. तसेच न्यू एज कोर्सेस मध्ये जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय आयटीआय सहभागी होऊन नवीन अभ्यासक्रम सुरू करतील करतील असे त्यांनी सांगितले.

**जनता दरबार -** यावेळी जनता दरबारात आलेल्या नागरिक नागरिकांच्या तक्रारी तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसंबंधी असलेल्या सूचना व मागण्या या दृष्टीने कौशल विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी निवेदने स्वीकारली. तसेच आलेल्या सूचनावर सकारात्मक निर्णय घेतले जातील असे सांगितले.

**इंडस्ट्रियल मीट -** सोलापूर शहर व जिल्ह्यातील जवळपास दीडशे उद्योजकांशी कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी निवेदन भवन येथील सभागृहात संवाद साधला. उद्योजक व उद्योगांच्या अडीअडचणी यांची माहिती घेऊन त्यावर शासन सकारात्मक दृष्टीने विचार करेल असे त्यांनी सांगितले. तसेच उद्योजकांनीही शासनाच्या रोजगार मेळाव्यात सक्रिय सहभागी होऊन कौशल्य प्रशिक्षण मिळालेल्या विद्यार्थ्यांना आपल्या कंपन्यांमध्ये संधी द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी आमदार देवेंद्र कोठे, रोहिणीताई तडवळकर, शशांक चव्हाण यांच्या सह कौशल्य विभागाचे विभाग व जिल्हास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### युतीचे संकेत

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार अशा पद्धतीची चर्चा जोर धरू लागली आहे. त्यातच, आधी शिवसेना खासदार संजय राऊत यांनी, तर उद्धव ठाकरे यांनी देखील युतीचे स्पष्ट संकेत दिले आहेत. त्यानंतर मुंबईसह कोल्हापुरातील शिवसैनिक आणि मनसैनिक यांना अत्यंत आनंद झाला आहे. हे दोन्ही बंधू एकत्र येणे ही महाराष्ट्राची गरज आहे. महाराष्ट्रातील बाळासाहेबांच्या सैनिकांची इच्छा आहे हे दोन्ही बंधू एकत्र यावेत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आल्यास इतर पक्षांची चांगलीच अडचण होऊ शकते. ठाकरे हा ब्रँड काय आहे, हे महाराष्ट्राला दिसून येईल अशा शब्दात शिवसैनिक आणि मनसैनिक मनातील इच्छा बोलून दाखवत आहेत. महाराष्ट्राच्या मनात जे आहे, तेच होईल, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले. त्यावर, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही हात जोडत, आम्ही महायुती म्हणून निवडणूक लढू आणि जिंकू असे म्हटले. उद्धव ठाकरेंनी शिवसेना-मनसे एकत्र येण्यासंदर्भात केलेल्या वक्तव्यावरुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर बोलताना फडणवीस म्हणाले की, त्यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया हे राज ठाकरे देतील, मी कशी प्रतिक्रिया देणारं, माझा काय संबंध येतो. यांनी साथ द्यायची आणि त्यांनी प्रतिसाद द्यायचा की नाही. आता तुम्हीच जास्त तारे तोडून राहिला, त्या दोघांपेक्षा जास्त माहिती तुमच्याकडे आहे हा सगळ्यात मोठा प्रॉब्लेम आहे. पण, काही हरकत नाही मला असं वाटतं की माध्यमांचं ते कामच आहे. आता तरी त्याच्यावर प्रतिक्रिया द्यायला काय आहे, असं मला वाटत नसल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील प्रत्येक गोष्ट शिकण्यासारखी : प्राचार्य डी. यु.एस. सुतार

## स्वेरीमध्ये ३५२ वा शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'छत्रपती शिवाजी महाराजांचे कष्ट, गुणग्राहकता, न्याय-निवाडा, नेतृत्व, परिश्रम, वैज्ञानिक दृष्टिकोन, लोकाभिमुख प्रशासन अशा विविध गुणांचे परीक्षण करता त्यांचा जगात आदर्श घेतला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांनी गड, किल्यांच्या बांधकामातून सिव्हील इंजिनिअरिंगचा उभा केलेला अदभूत नमुना दिसून येतो. त्यामुळे इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याची प्रेरणा घ्यावी. महाराजांची प्रत्येक गोष्ट शिकण्यासारखी व अनुकरण करण्यासारखी आहे.' असे प्रतिपादन स्वेरी व्यवस्थापनाच्या अंतर्गत असलेल्या खेड (ता. उत्तर सोलापूर) मधील स्वामी विवेकानंद इन्टिटयूट ऑफ टेक्नोलॉजीचे प्राचार्य डॉ. यु.एस. सुतार यांनी केले.




गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पदवी व पदविका) व कॉलेज ऑफ फार्मसी (पदवी व पदविका) मधील राष्ट्रीय सेवा योजना व क्रिडा विभागाच्या वतीने स्वेरीमध्ये ३५२ वा 'राज्याभिषेक दिन' तथा 'शिवस्वराज्य दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी भव्य शिवमुर्तींचा अभिषेक व पूजन प्राचार्य डॉ. यु.एस सुतार व लक्ष्मण कराळे (वस्ताद) यांच्या हस्ते करण्यात आले. प्रथम वर्ष इंजिनिअरींगचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी 'शिवराज्याभिषेक दिना'चे महत्व सांगून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यावर प्रकाश टाकला. प्रवेश द्वाराजवळ गुलाबी, पिवळ्या व भगव्या रंगांच्या झेंडूच्या फुलांचा वापर करून आकर्षक रांगोळी काढली होती. यावेळी बाळासाहेब भोसले, स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी. मणियार, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस. व्ही. मांडवे, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, डिग्री इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता डॉ. के. बी. पाटील, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकॉम्युनिकेशन इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. सुमंत आनंद, एमबीएचे विभागप्रमुख डॉ. के. पी. गलानी, स्वेरीचे परीक्षा नियंत्रक डॉ. एस.ए. लेंडवे, प्रा.अंतोष द्याडे, प्रा. यु.एल. अनुसे, प्रा. पी. व्ही. मोरे, प्रा. प्रकाश अंदोरे, इतर अधिष्ठाता, विभागप्रमुख, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. ए.बी. चौंडे, डॉ. एम.एम.आवताडे, डॉ.डी. एस.चौधरी यांच्यासह प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, अभियांत्रिकी व फार्मसीचे विद्यार्थी, पालक वर्ग आदी उपस्थित होते.

# भाविकांच्या सोयीसाठी वटवृक्ष मंदिराचे उपक्रम कौतुकास्पद : मंगलप्रभात लोढा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांसाठी करण्यात आलेल्या सोईसुविधा आणि मंदिर समितीचे सामाजिक-धार्मिक उपक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन राज्याचे कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले. मंदिर भेटीदरम्यान आमदार सचिन कल्याणशेट्टी व प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते लोढा यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महेश इंगळे, आत्माराम घाटगे, महेश गोगी, श्रीशैल गवंडी, शिवशरण जोजन, राजू हिप्परगी आदी मान्यवर आणि भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

# महावितरण तर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला व निबंध स्पर्धेचे विजेत्यांना बक्षीसांचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त आयटीआय व होरायझन अकॅडमी मध्ये घेण्यात आलेल्या चित्रकला व निबंध स्पर्धेचे निकाल जाहीर झाले असुन ही स्पर्धा दि.३ व दि.४ जून रोजी घेण्यात आली होती होती.



आयटीआय येथे झालेल्या निबंध स्पर्धेत तृतीय क्र. प्रशांत शरद गडाख, द्वितीय क्र. वैष्णवी किरण चव्हाण व प्रथम क्रमांक अमोल राजेंद्र सांगळे यांचा आला असून, चित्रकला स्पर्धेमध्ये तृतीय क्र. अर्चना अनिल कोकाटे, द्वितीय क्र. जागृती संतोष रसाळ, व प्रथम क्रमांक सविता दिलीप अलगट हिचा आला आहे.

होरायझन अकॅडमी स्कूल मध्ये घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत प्रथम क्रं. स्वरा संदीप भाबड, द्वितीय क्रं. वैष्णवी शिवाजी डवखर, तृतीय क्रं. वेदांत सुनील काळे आला असून चित्रकला स्पर्धेमध्ये प्रथम क्र. रितिका रोहिदास गव्हाणे, द्वितीय क्रं. पलक्षी निखिल व्यवहारे, तृतीय क्रं. प्रणिती अनिल कुंभार्डे हिचा आला असून महावितरणच्या पाल्यांसाठी घेण्यात आलेल्या स्पर्धेत निबंध स्पर्धेत प्रथम क्रं. राधिका सुरेश वडगुले, द्वितीय क्रं. सोनाली प्रकाश टबाले, तृतीय क्रं. योगिता शंकर पवार हिचा आला आहे, तर चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रं. श्रावणी अमोल तांबे, द्वितीय क्रं. वेदांत हेमंत ढेमे, तृतीय क्रं. अवधुत देवेंद्र टापसे यांचा आला आहे,आयटीआय मध्ये ऍडव्होकेट गायकवाड व प्राचार्य शिंदे यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले, तर होरायझन अकॅडमी मध्ये मुख्याध्यापिका सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले.

आज दि. ०६.०६.२०२५ रोजी सकाळी १० ते १०.१५ दरम्यान सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गांने सुरक्षिततेची शपथ घेतली.

# पडघा , बोरिवलीसह अनेक गावातील संशास्पद जन्म नोंदीची किरीट सोमय्यांकडून तपासणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भाजपा नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी गुरुवारी तालुक्यातील बोरिवली व पडघा ग्रामपंचायतीची बोगस जन्म, दाखल्याबाबत भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी चौकशी केल्याने ग्रामपंचायत प्रशासनात खळबळ उडाली आहे. ग्राम पंचायत कार्यालयास भेट देत तेथील जन्म नोंदीच्या कागदपत्रांची तपासणी केली आहे. महाराष्ट्रात जन्म मृत्यू नोंदी मध्ये फार मोठा घोटाळा झाला आहे.मागील चार महिने याबाबत शोध घेत आहे.२०२४ मध्ये राज्यात २ लाख २४ हजार नागरिकांनी खोटे कागदपत्र देऊन जन्म नोंदी साठी अर्ज केले.त्या सर्वांच्या नोंदी तपासण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत.पडघा परिसरातील अर्धा डझन गावां संदर्भात काही संशयास्पद जन्म नोंदी केल्याची मला माहिती मिळाली आहे अशी माहिती देत मालेगाव येथे तर १०४४ अशा पद्धतीने जन्म प्रमाणपत्र घेतले आहे. त्यातील २१७ गायब आहेत.त्यामुळे आंतरिक सुरक्षा धोक्यात येत आहे.जन्म प्रमाणपत्र घेतले की लगेच दुसऱ्या दिवशी पासपोर्ट साठी अर्ज,चौथ्या दिवशी लगेच पासपोर्ट मिळाले की परदेशात रवाना होत आहेत.अशा गावात मी प्रत्यक्ष भेटी देऊन मी चौकशी करणार असल्याचे किरीट सोमय्या यांनी शेवटी स्पष्ट केले आहे.



संपूर्ण महाराष्ट्रातील संशयास्पद जन्म मृत्यू नोंदणी बाबत भाजपा नेते माजी खासदार किरीट सोमय्या हे महाराष्ट्रातील विविध पालिका कार्यालय ,तहसीलदार कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी भेटी देऊन कागदपत्रांची पडताळणी करीत आहेत. भिवंडी तालुक्यातील पडघा ,बोरीवली ग्रामपंचायत कार्यालयास भेट देऊन तेथील जन्मृत्यू नोंद कागदपत्रांची पडताळणी केली आहे.त्या सोबतच वाडा तालुक्यातील कुडूस, वडवली

व भिवंडी तालुक्यातील अंबाडी या गावांना सुद्धा भेटी दिल्या आहेत. बोरीवली येथील एटीएम च्या कारवाईनंतर हा भेटीचा दौरा असल्याने पोलिसांनी या वेळेस चोख असा बंदोबस्त ठेवला होता. यावेळी त्यांच्या सोबत भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी,गटविकास अधिकारी गोविंद खामकर,नायब तहसीलदार आदेश म्हात्रे, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे सुरेश मनोरे, पोलिस उपअधीक्षक राहुल झालटे,पडघा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक बाळा कुंभार, यांसह पडघा ग्रामपंचायतीचे सरपंच रविंद्र विशे बोरीवली सरपंच अन्वर पिंजारी ग्रामपंचायत अधीकारी भास्कर घुडे, आर. जे. म्हस्के , भाजपा पडघा शहर अध्यक्ष उमेश शेरेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दत्तात्रेय पाटोळे, पंचायत समिती माजी सभापती अशोक शेरेकर, दिनेश गंधे, अविनाश पातकर, अभिषेक नागावेकर सह भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांच्या तक्रारी नंतर अखेर सहाय्यक अभियंता सूर्यकांत सातपुते यांची बदली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/प्रतिनिधी : महापालिकेच्या एन विभाग कार्यालयातील घन कचरा व्यवस्थापन विभागातील सहाय्यक अभियंता सूर्यकांत सातपुते यांचा तीन वर्षाचा कालावधी संपला होता. तरी देखील ते खुर्ची सोडायला तयार नव्हते,कायद्यानुसार ३ वर्षाचा कालावधी संपला तरी सदर अधिकाऱ्यांच्या बदल्या प्रशासन का करित नाही. असा संतप्त सवाल माहिती अधिकार कार्यकर्ते केतन भोज यांनी संबंधित प्रशासनाला केला होता. महापालिकेच्या एन विभाग कार्यालयातील घन कचरा व्यवस्थापन विभागातील सहाय्यक अभियंता म्हणून सूर्यकांत सातपुते २०१७ पासून रुजू झाले होते. तरी यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यावर वरिष्ठांचा व प्रशासनाचा अंकुश न राहिल्यामुळे अशा अधिकाऱ्याची अरेरावी आणि दांडगाई वाढलेली होती. त्यांच्या मनमानी कारभारामुळे नागरिक प्रचंड त्रस्त झाले होते.सलग ३ वर्षाचा कार्यकाळ पूर्ण केलेला असताना मनपा प्रशासन यांना येवढी मोठी मुदतवाढ एखाद्या अधिकाऱ्याला कशी काय देऊ शकते? आणि जर मुदतवाढ द्यायची नसेल तर त्यांच्या जागी नव्या अधिकाऱ्यांची तरी नियुक्ती करायला हवी.

घन कचरा व्यवस्थापन, एन विभागातील सहाय्यक अभियंता सूर्यकांत सातपुते यांची बदली का होत नाही? असा प्रश्न भोज यांनी प्रशासनाला विचारला होता. यांसारखे अधिकारी वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी ठाण मांडून बसले आहेत. तरी अशा अधिकाऱ्यांच्या कार्यकाळची व कामकाजाची चौकशी करून लवकरात लवकर बदली करावी. अशी मागणी केतन भोज यांनी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव, महापालिका मुख्य आयुक्त तथा प्रशासक, राज्याचे मुख्य सचिव, उपलोक आयुक्त तसेच सहाय्यक आयुक्त एन विभाग यांच्याकडे केली होती. अखेर त्यांच्या तक्रारीची प्रशासनाने दखल घेतली असून, सुर्यकांत सातपुते - सहाय्यक अभियंता(घ.क.व्य.)एन विभाग यांना दि.०२.०६.२०२५ रोजी एन विभाग कार्यालयातून प्रमुख अभियंता (घ.क.व्य.)यांच्या क्र. प्र.अभि./१८३९ दि.३०.०५.२०२५ आदेशान्वये कार्यमुक्त बदली करून कार्यकारी अभियंता (परिवहन) शहर विभागात पाठविण्यात आले आहे. तसेच आता मनपा एन विभाग सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) या ठिकाणी किरण सिंग पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## शिवसेना शिंदे गटासाठी कर्तृत्ववान चेहरा मिळाला

### अरुण जगताप यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान

# नितीन काळे यांची प. महाराष्ट्र संपर्क प्रमुखपदी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनीधी : संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये शिवसेना शिंदे गटाकडे प्रवेश करण्यासाठी अनेक दिग्गज नेत्यांची धडपड सुरू आहे. अशातच आज शुक्रवारी पंढरपूरचे सुपुत्र नितीन काळे यांचीही मुंबई येथील बाळासाहेब भवन या ठिकाणी शिवसेना ग्राहक तक्रार निवारण कक्षाचे पश्चिम महाराष्ट्र पदासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. यामुळे शिवसेना शिंदे गटासाठी एक कर्तुत्वान चांगला चेहरा मिळाल्याचे दिसत आहे.

नितीन काळे यांना लहानपणापासून सामाजिक कार्याची आवड आहे. अनेकांच्या अडचणीला धावून जाण्याचा त्यांचा एक अंगीकृत गुण आहे. त्यामुळे शिवसेना शिंदे गट वाढीसाठी एक चांगला युवा नेता लाभला आहे. यामुळेच पक्षप्रमुख आणि राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने शिवसेना उपनेते आणि शिवसेना ग्राहक तक्रार निवारण कक्षचे प्रदेश अध्यक्ष आरुण जगताप यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले आहे.

**गटबाजी नव्हे संघटन वाढविणार: नितिन काळे**

**आपण पंढरपूर ग्रामीण भागातून आलो आहोत. तरीही सर्वोत्तम पद आपल्याला देतं असताना पश्चिम महाराष्ट्राची जबाबदार दिली आहे.ही केवळ शोभेचे भावले म्हणून पद मिळाले नाही. तर या पश्चिम महाराष्ट्रामध्ये फिरत असताना शिवसेना कशी वाढेल. यासाठी जास्तीचे प्रयत्न केले जाणार आहेत. सोलापूर जिल्ह्यातील शिवसेनेत यापूर्वी पाहिले असता विविध पदाधिकारी यांचे वेगवेगळे गट आहेत. मात्र मला त्या गटातटाच्या भानगडीत पडायचे नाही. त्यामुळे संघटन वाढीला ब्रेक लागू शकतो. यासाठीच आपण गट तट न पाहता केवळ शिवसेना वाढीसाठीच आपला वेळ खर्ची घालवणार असल्याचे नितीन काळे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.**



पश्चिम महाराष्ट्राचे संपर्कप्रमुख म्हणुन नियुक्ती पत्र मिळताच नितीन काळे यांनी आपल्या समाजकार्याची दखल शिवसेना पक्षाकडून घेण्यात आली आहे. त्यासाठी आपण शिवसेना पक्ष वाढीसाठी जास्तीत जास्त आपला वेळ घालविणार असून हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचे विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण यांचा प्रचार आणि प्रसार करणार असल्याचे सांगीतले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आषाढी वारी कालावधीत वारकरी भाविकांना सुविधा उपलब्ध करण्यासाठी निधीची कमतरता नाही : पालकमंत्री जयकुमार गोरे

## आषाढी यात्रा कालावधीत येणाऱ्या वारकरी भाविकांची होणार राहण्याची सुविधा

- ■ चंद्रभागा नदीपात्र स्वच्छतेसाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करण्यात येणार
- ■ लोकसहभागातून पंढरपूर शहरात राबविण्यात येणार स्वच्छता अभियान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/पंढरपूर, दिनांक ६:- आषाढी यात्रेसाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासह अन्य संतांच्या पालखी सोहळ्याबरोबर मोठ्या प्रमाणात वारकरी भावीक चालत येतात. येणाऱ्या वारकरी भाविकांना पालखी मार्ग, तळ या ठिकाणी सुविधा देण्यासाठी निधीची कमतरता भासणार नाही. तसेच या काळात पालखी सोहळ्या व्यतिरिक्त लाखो भाविक पंढरपुरात येतात, अशा सर्व भाविकांच्या राहण्याची व्यवस्था पंढरपूर शहरात करण्यात यावी यासाठी प्रशासनाने तयारी करावी, अशा सूचना ग्रामविकास व पंचायतराज मंत्री मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या.

पंढरपूर येथील केबीपी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित आषाढी वारी सोहळा २०२५ च्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद , मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, विभागीय आयुक्त कार्यालयाचे अपर आयुक्त तुषार ठोंबरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे




व्यवस्थापक मनोज श्रोती, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी अर्जुन भोसले, पंढरपूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, तसेच अन्य विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, आषाढी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांना उत्कृष्ट सोयी सुविधा देण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. तसेच ही आषाढी वारी स्वच्छतेची वारी होण्यासाठी प्राधान्य दिले जात आहे. यात्रा कालावधीत चंद्रभागा नदीपात्र कायम स्वच्छ राहील यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करण्यात येणार आहे. तसेच वारीपूर्वी पंढरपूर शहरात लोकसहभागातून स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. वारकरी भाविकांना उपलब्ध सुविधा तसेच सूचनांची माहिती देण्याचे फलक किमान १५ फूट उंचीचे लावावेत. नदीपात्रातील होड्यांची नोंद घेऊन होडी मालक व चालक यांचे नाव, आसन क्षमता निश्चित करून होडीत जास्त लोक बसणार नाहीत याची दक्षता घ्यावी. तसेच होडीमध्ये मुबलक प्रमाणात लाईफ जॅकेटची व्यवस्था ठेवली पाहिजे, असेही निर्देश त्यांनी दिले.

तसेच शहरातील पार्किंगच्या ठिकाणी मुरमीकरण व रोलिंग करावे. पालखी मार्ग, तळ तसेच पंढरपूर शहरातील अतिक्रमणे काढण्यासाठी पोलीस नगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागाने समन्वय साधून संयुक्तपणे कार्यवाही करावी. वाहतूक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी पालखी मार्ग तसेच शहरातील रस्त्यावर बंद पडलेली वाहने तात्काळ काढण्याची व्यवस्था पोलीस प्रशासनाने करावी. वाखरी ते पंढरपूर रस्त्याचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तात्काळ पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करावी, अशाही सूचना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आषाढी वारीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने केलेल्या तयारीची सविस्तर माहिती दिली. तसेच या वारी कालावधीत मानाच्या पालख्यासह अन्य पालख्या, दिंड्या, वारकरी व भाविकांना कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही यासाठी प्रशासन काटेकोरपणे नियोजन करत असल्याचेही त्यांनी सांगितले.



## शिवराज्याभिषेक दिनानिमित्त श्री स्वामी समर्थ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे व्याख्यानमाला संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/ प्रतिनीधी

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे शिवराज्याभिषेक दिनानिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

व्याख्यानमालेचे उद्धाटन मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस यांचे हस्ते व्हिडिओद्वारे ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले , संस्थेत व्याख्यानमालेचे उद्धाटन संस्थेचे आयएमसी चेअरमन श्री राजशेखर हिप्परगी यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आले यावेळी आयएमसी व्हाईस चेअरमन श्री यशवंत धोंगडे आयएमसी सदस्य श्री कमलाकर सोनकांबळे , श्री विजय इंगळे श्री अमरनाथ पोतदार श्री शिवशंकर स्वामी श्री शरणय्या मसुती व संविधान प्रचारक श्री सागर सोनकांबळे लेखाधिकारी श्री संतोष वगाले आणि संस्थेचे गटनदेशक तथा प्रभारी प्राचार्य श्री दिलीप कुमार गायकवाड यांची प्रमुख उपस्थित होते सर्व मान्यवरांचे स्वागत प्राचार्य गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.

शिवराज्याभिषेक दिन व्याख्यानमालेची संकल्पना राज्याचे कौशल्य रोजगार उद्योजकता व नावीन्यता विभाग मंत्री श्री मंगल प्रभात लोढा यांची होती यावेळी कौशल्य गीत सादर करण्यात आले या व्याख्यानमालेमध्ये प्रमुख वक्ते श्री संतोष वगाले यांनी स्वदेशी विचारांचा प्रसार या विषयावर मार्गदर्शन केले व प्रमुख वक्ते श्री सागर सोनकांबळे यांनी पर्यावरण संरक्षण या विषयावर अनमोल असे मार्गदर्शन केले संस्थेमध्ये विशेष कार्य केल्याबद्दल श्री निलेश घोडके सर श्री विजय बोगाळे सर श्री स्वामी सर गेजले मॅडम व भांडारपाल श्री सोनद सर यांचा सत्कार श्री यशवंत धोंगडे व कमलाकर सोनकांबळे यांचे हस्ते करण्यात आले शेवटी राज्य गीताने सदर व्याख्यानमालेची सांगता झाली सूत्रसंचालन श्री एम जी नदाफ सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री दिनेश मंठाळे सर यांनी केले सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेतील सर्व शिल्प निदेशक कर्मचारी वृदआणि प्रशिक्षणार्थी यांचे अनमोल सहकार्य लाभले

## तुळजापूर तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने भारत जिंदाबाद यात्रा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्यावतीने सिंदूर ऑपरेशन यशस्वी करणाऱ्या भारतीय जवानाच्या सन्मानार्थ भारत जिंदाबाद यात्रा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार तुळजापूर तालुका रिपाइंच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून भारत जिंदाबाद यात्रा काढण्यात आली.

(दि ५) जून गुरूवार रोजी तुळजापूर तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने भारत जिंदाबाद यात्रा डॉ



आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक आदि मार्गावरून काढून तहसील कार्यालय समोर या भारत जिंदाबाद तिरंगा रॅलीची सांगता करण्यात आली.

यावेळी तुळजापूर शहरातील माजी सैनिक प्रकाश भांजी,हणमंत चव्हाण,अरूण माने दत्ता नवगिरे आदि माजी सैनिकांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे मराठवाडा प्रदेश कार्याध्यक्ष आनंद पांडागळे, युवक जिल्हा कार्याध्यक्ष अरूण लोखंडे, जिल्हा सचिव एस. के गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, तालुका अध्यक्ष बाबासाहेब मस्के, युवक तालुका सरचिटणीस शुभम कदम, शरद कदम, रमेश गायकवाड, सुरेंद्र सुरवसे, महादू सोनवणे, विजय गायकवाड, बापू मोटे किसन पांडागळे, प्रहारचे तालुकाध्यक्ष मारूती पवार, सामाजिक कार्यकर्ते रविंद्र साळुंके, अरविंद लोखंडे, राजेंद्र शिंदे, चोखोबा सिरसट, संजय गायकवाड, भिमराव सोनवणे, दादासाहेब बनसोडे, आदिंसह रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भूमिपुत्र वाघ यांचा विविध सामाजिक उपक्रमातून वाढदिवस साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील समाज सेवक,लेखक, दिग्दर्शक, चित्रपट निर्माते साहित्यिक म्हणून कार्य करत असलेले कळंब तालुक्यातील सातेफळ या गावचे सुपुत्र भूमिपुत्र वाघ यांचा विविध सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून करून वाढदिवस साजरा केले.

मॉर्निंग वॉकच्या वतीने सकाळी सत्काराचा कार्यक्रम झाला. त्यानंतर उपजिल्हा रुग्णालय इथे शल्य चिकित्सक जाधव यांच्या उपस्थितीमध्ये आणि मॉर्निंग वॉकचे सर्व सदस्य, तसेच अनाथाची माय समाजसेविका विद्या ताई वाघ यांच्या उपस्थितीमध्ये शासकीय उपजिल्हा रुग्णालय या ठिकाणी जन्म झालेल्या सर्व लहान बाळांसाठी नव्या कपड्याचं भेट देण्यात आली. उपजिल्हा रुग्णालय या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले त्यानंतर सायंकाळी शिवपुरी रोड या ठिकाणी वृक्षारोपण करून मॉर्निंग वॉक मधील सदस्यांना केशर आंब्याची रोपे सप्रेम भेट देण्यात आले.

सायंकाळी विश्वविनायक न्यूज रिपोर्टर कार्यालयामध्ये कार्यकारी मंडळाचे सर्व सदस्य यांच्या उपस्थितीमध्ये सत्कार ठेवण्यात आला.

या सर्व कार्यक्रमांमध्ये विद्याताई वाघ मॉर्निंग वॉकच्या सर्व सदस्य, मित्रपरिवार उपस्थित होते. त्यासोबत भूमिपुत्र वाघ याचे गुरुजी विश्वनाथ अण्णा तोडकर यांची ६१ साजरी करण्यात आली. त्यांच्या ६१ च्या निमित्ताने वर्षभर विविध कार्यक्रम घेण्यात येणार असल्याबद्दल भूमिपुत्र वाघ यांनी माहिती सांगितली.

विविध कार्यक्रमांमध्ये, बाळासाहेब माने विकास गायकवाड, ॲड येळीकर बाबरे, लोखंडे, इंजिनीयर सूर्यवंशी, शिवानंद दळगडे, भाऊसाहेब उगले, अप्पा जाधव, रामभाऊ पतंगे, इंगोले, नाबदे आदी मान्यवर उपस्थित होते.

भूमिपुत्र वाघ यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने उपजिल्हा रुग्णालयांमध्ये कविता पवार यांनी एक लाख १७ हजार रुपयाची कपडे देऊन उपरोक्त केले.

महाराष्ट्रातून महाराष्ट्र लोकविकास मंच, उत्तरदायित्व एनजीओ नेटवर्क, आणि मित्र परिवारातून वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

**स्वरूपला पाहताच आईने मोठ्याने हंबरडा फोडला**

**गणेश अंकुशराव यांचे सर्वत्र होतंय कौतुक**

# आरोपीने अवघ्या तीन वर्षाच्या पळवून आणलेल्या बालकाला पंढरपुरात समाजसेवक गणेश अंकुशराव यांनी आईवडिलांकडे सुखरूपपणे केले सुपूर्द

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपुर (प्रतिनिधी) : लातुरमधून पळवून आणलेल्या एका बालकाला आरोपीने पंढरपुरात सोडून पलायन केले होते, हा बालक पंढरपुरात फिरताना आढळताच येथील समाजसेवक गणेश अंकुशराव यांनी केलेल्या कृतीचं सर्वत्र कौतुक होत आहे.

भुवैकुंठ पंढरपूर नगरीत माणुसकीचा जिवंत झरा मनात असणारी काही माणसं आहेत, यापैकीच एक म्हणजे येथील महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष समाजसेवक गणेश अंकुशराव.

गणेश अंकुशराव यांनी पंढरपुरातील अनेक अनाथ, निराधार, वंचितांवर ओढवलेल्या विविध प्रकारच्या संकटातून सोडवल्याचे अनेक किस्से आहेत, याचबरोबर हरवलेल्या अनेक लहान मुलांनाही त्यांच्या आई-वडिलांकडं सुखरूपपणे पोहोचवण्याचं पुण्यकर्मही त्यांनी अनेकदा केलंय. नुकतंच एका आरोपीने पळवून आणलेल्या अवघ्या तीन वर्ष तीन महिन्यांच्या बालकाला सुरक्षितरित्या त्यांच्या पालकांकडं सुपूर्द करण्यामध्ये महत्वाची भुमिका पार पाडली आहे. जाणुन घ्या नेमकं काय घडलं ते ...

याबाबत समजलेल्या अधिक माहितीनुसार दिनांक २६ मे २०२५ रोजी स्वरूप भीमाशंकर स्वामी वय वर्षे ३ वर्षे ३ महिन्याचा मुलगा हनुमान मंदिर गुमास्ता कॉलनी कव्हा रोड लातूर येथुन सकाळी १०/३०ते ११ वाजण्याच्या सुमारास हरवला होता त्या लहान मुलाचा आई आणि वडीलांनी नजीकच्या पोलिस ठाण्यात हरविल्याची तक्रार केलेली केलेली होती.

लातूर पोलिसांकडून स्वरुप स्वामी हा लहान असल्यामुळे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फुस लाऊन पळवून नेलेले असल्याची लातूर पोलिसांना खात्री पटली. लातूर पोलिसांनी या मुलाच्या शोध घेण्यासाठी अनेक पथके तयार करण्यात आलेले होते. या लहान मुलाचा पोलीस प्रशासन ही शोध घेत होते.



हा मुलगा पंढरपूर येथील चंद्रभागेच्या काठावरील आद्य क्रांतीकारक राघोजी भांगरे चौकात आदिवासी कोळी समाजाचे नेते गणेश यांना एकटाच फिरत असल्याचे लक्षात आले.

भीमा नदीचे पात्र हे संपूर्ण पाण्यानें भरलेले असल्यामुळे तो मुलगा चंद्रभागेच्या पाण्याच्या पात्रात जाईल म्हणून त्या मुलाला उचलून बाजूला आणुन विचारपुस केली त्या लहानशा चिमुकाल्या स्वताचे नाव सांगता येत नव्हते. गणेश अंकुशराव यांनी सदर मुलास घेऊन सर्वत्र त्या मुलाचा पालकाचा शोध घेतला.

गणेश अंकुशराव यांनी ताबडतोब पंढरपूर शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधुन वरील मुलाची माहिती फोटो आणि व्हिडिओ माध्यमातून दिली. लगेच हा सदरचा मुलगा हा लातूर येथून हरवल्याची मिसींग तक्रार दाखल असल्याची पंढरपूर शहर पोलीसांन कडून सांगण्यात आले. लातूर शहर पोलीस ठाणे येथे मिंसीग दाखल असलेल्या पोलीस ठाण्याशी संबंधित मुलाचा नातेवाईकांना मुलाची माहिती दिली.

आपला मुलगा हा पंढरपूर येथे सुखरूप असल्याचे समजाच लातूर शहर पोलीस पथक एका संशीयत आरोपीसह मुलाचे नातेवाईक पंढरपूर कडे तातडीने रवाना झाले. संबंधित लहान मुलास शहर पंढरपुर पोलीसांचा मदतीने लातूर शहर पोलीसांचा नातेवाईक समवेत स्वाधीन करण्यात आले. आज स्वरूपला पाहताच आईने मोठ्याने हंबरडा फोडला. आपल्या लेकराची सुरक्षितरित्या परत मिळवून दिल्याबद्दल या मातेनं समाजसेवक गणेश अंकुशराव विजय अभंगराव गणेश माने महेश माने चैतन्य तारापूरकर आप्पा करकमकर रोहित करकमकर कृष्णा माने यांचे व पोलिसांचे आभार मानले.

३ वर्षे ३ महिन्याचा स्वरूप स्वामी हा लातूर वरुन पंढरपूरला आलाच कसा? या कटातील आरोपी समवेत आणखीन कोणी आहे का? याचा शोध आता लातूर शहर पोलीस घेत आहेत.

# सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून भक्ती सागर, वाळवंट आणि पालखी तळांची पाहणी

## पंढरपूर, माळशिरस तालुक्यातील पालखीतळांची, रिंगण सोहळ्याच्या ठिकाणची केली पाहणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रेच्या अनुषंगाने यात्रा कालावधीत पालखी सोहळ्या सोबत येणाऱ्या वारकरी भाविकांना पालखी तळांवर, भक्ती सागर (६५ एकर), चंद्रभागा वाळवंट येथे उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या सुविधांची पाहणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून करण्यात आली.

यावेळी ६५ एकर (भक्ती सागर) येथे पाणी साठणार नाही याची दक्षता घेऊन मुरमीकरण व रोलिंग करावे. सार्वजनिक बांधकाम विभागाने आवश्यक ती तांत्रिक मदत संबंधित यंत्रणेला करावी. तसेच या ठिकाणी वारकरी भाविकांना कायमस्वरूपी सुविधा देण्याबाबत नियोजन करावे करावे. स्वच्छता गृहाची तातडीने दुरुस्ती करून स्वच्छता करावी. चंद्रभागा नदी पत्राच्या कडेला असणारी काटेरी झाडे झुडपे, मातीचे व दगडाचे ढिगारे तात्काळ काढून घ्यावेत. नदीपात्रातील पाणी स्वच्छतेसाठी नगरपरिषदेकडून बसविण्यात आलेल्या सेबर टेक्नॉलॉजी मशीनला तातडीने वीज वितरण कंपनीने विद्युत पुरवठा करण्याचे निर्देश पालकमंत्री गोरे यांनी दिले.

तसेच पालकमंत्री श्री.गोरे यांनी वाखरी, बाजीराव विहिर, श्री संत सोपान काका,भंडीशेगाव, पिराची कुरोली, वेळापूर, माळशिरस, नातेपुते, धर्मपुरी येथील पालखी तळांची व रिंगण सोहळ्याच्या ठिकाणची पाहणी केली.

यावेळी बाजीराव विहिर (वाखरी) येथे संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली महाराज पालखी सोहळ्याचे गोल रिंगण होते. हा रिंगण सोहळा





पाहण्यासाठी वारकरी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी उड्डाणपुलाच्या शेजारी असणारे लोखंडी बॅरिकेटिंग रिंगण सोहळा कालावधीत काढून घेण्याच्या सूचना त्यांनी केल्या. तसेच पालखीतळांवर पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या वारकरी भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधामध्ये पिण्याचे पाणी, शौचालय, स्नानगृह, महिला भाविकांची व्यवस्था आरोग्य सुविधा, सुरक्षा व्यवस्था आदी बाबतची माहिती तसेच सर्वच पालखी तळांवर मुरमीकरण करावे अशा सूचना दिल्या.

यावेळी त्यांच्या समवेत आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, आमदार उत्तमराव जानकर, माजी आमदार राम सातपुते, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, विभागीय आयुक्त कार्यालयाचे अपर आयुक्त तुषार ठोंबरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, प्रांताधिकारी सचिन इथापे, विजया पांगारकर, उपविभागीय पोलिस अधिकारी अर्जुन भोसले, कार्यकारी अभियंता अमित निमकर,तहसीलदार सचिन लंगुटे, सुरेश शेजुळ मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, मंदिर समितीची व्यवस्थापक मनोज श्रोत्री तसेच अन्य विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

# पर्यावरण दिनानिमित्त माफ़सूच्या संचालनालय विस्तार शिक्षण येथे वृक्षारोपण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : प्रवीण बागडे : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विश्वविद्यालय (माफसू), नागपुर अंतर्गत संचालनालय, विस्तार शिक्षण आणि शेतकरी भवन परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. सध्याच्या काळात मोठया प्रमाणात होणार वृक्षतोड आणि त्यामुळे वाढणारे तापमान ही गंभीर समस्या बनली आहे. या वर्षी तापमान हे ४५ ते ४७ अंश सेल्सिअस पर्यंत पोहोचले असुन यापुढेही तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. यामुळे 'झाडे लावा, झाडे वाचवा' ही काळाची गरज बनली आहे. वृक्ष लागवड आणि त्याचे संवर्धन यावर भर देण्याचे आवाहन या कार्यक्रमात करण्यात आले.

या प्रसंगी संचालक, विस्तार शिक्षण डॉ. अनिल भिकाने, तांत्रीक अधिकारी डॉ. सारीपुत लांडगे, कास्ट्राईब महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे (नागपूर शाखा) उपाध्यक्ष प्रवीण बागडे, सचिव जितेंद्र हातमोडे, मोहन कापसे, अतुल जाधव, राजेश गहलोद आणि स्वप्नील दाते ई. प्रामुख्याने उपस्थित होते. या उपक्रमाद्वारे पर्यावरण संरक्षणासाठी सामूहिक प्रयत्नांचे महत्व अधोरेखित करण्यात आले.




# कल्याणशेट्टी महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

### शिवकाळातील इतिहास प्रसिद्ध घराण्यावर संशोधन व्हावे

शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल इतिहास संशोधक नितीन अणवेकर यांचा महाविद्यालयाच्या वतीने उद्योजक मल्लिकार्जुन मसुती यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. जिल्ह्यात शिवकाळातील इतिहास प्रसिद्ध घराणे आहेत, त्यावर संशोधकांनी संशोधन करावे अशी अपेक्षा यावेळी नितीन अणवेकर यांनी व्यक्त केली.

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्यास सोलापूर जिल्ह्यातील तोंडले- बोंडले येथील कर्तबगार पुरुष राणोजी चव्हाण उपस्थित होते. ते छत्रपती शिवाजी महाराजांचे निष्ठावंत सेवक होते. त्यांच्या कर्तबगारीमुळे आपला जिल्हा पावन झाला आहे असे प्रतिपादन इतिहास संशोधक नितीन अणवेकर यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इतिहास अभ्यास मंडळाने आयोजित केलेल्या शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती होते. प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, ज्युनिअर विभाग प्रमुख पुनम कोकळगी उपस्थित होते.

### कल्याणशेट्टी महाविद्यालयात इतिहास संशोधक नितीन अणवेकर यांनी सांगितल्या राज्याभिषेक सोहळ्याच्या आठवणी

पुढे बोलताना ते म्हणाले की, सोलापूर जिल्हा मंदिर, मूर्ती, शिलालेख, तांब्रपट याचे दालन आहे. जिल्ह्यात ऐतिहासिक भुईकोट किल्ले, वाडे, गड इतिहासाची साक्ष देत उभी आहेत. त्यापैकी तोंडले बोंडले येथील चव्हाण घराण्याचा चिरेबंदी वाडा प्रसिद्ध आहे. राणोजी चव्हाण यांचे तेथेच वास्तव्य होते. त्यांनी शिवाजी महाराजांबरोबर युद्ध मोहिमेत भाग घेतला होता. मराठा काळात चव्हाण घराण्यास कागदपत्रावर अधोरेखित करण्यासाठी शिक्का तसेच स्वतंत्र ध्वजाचा मान देण्यात आला होता. राणोजी चव्हाण हे महाराजांचे निष्ठावंत सेवक असल्यामुळे राज्याभिषेक सोहळ्यास उपस्थित होते. पुढे ते गोवळकोंडाच्या लढाईत मारले गेले. ही वार्ता ऐकून छत्रपती शिवाजी महाराजांना खूप दुःख झाले. असे संदर्भ इतिहासात आहेत असे अणवेकर यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा मधुबाला लोणारी यांनी केले सूत्रसंचलन प्रा शितल झिंगाडे यांनी केले आभार प्रा भीम सोनकांबळे यांनी मानले.

# सांगोला येथे चोरट्याने केली अनोखी चोरी: दोन महिलांच्या हातातील पाटल्या कट करून पळवल्या चोरट्याने

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : एसटी बस मधून गर्दीतून उतरत असताना गर्दीचा फायदा घेऊन सव्वा लाख रुपये किमतीचे तीन तोळे वजनाची सोन्याची पाटली अज्ञात चोरट्याने कट करून पळवून नेली. असल्याची घटना सांगोला बस स्थानकावर दोन जून रोजी २०२५ रोजी एसटी बस मध्ये चढत असताना उजव्या हातातील दोन तोळे वजनाची सोन्याची पाटली पळून नेले असून महिलांमध्ये घबराटीचे वातावरण पसरलेले आहे. चोरीची फिर्याद भाग्यश्री पाटणे( वय वर्ष ५८ राहणार कुंभार गल्ली सांगोला) यांनी सांगोला पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली आहे. दिनांक २ जून २०२५ रोजी भाग्यश्री पाटणे पतीसोबत मंगळवेढा येथे सकाळी ११ वाजता गेले असता त्यानंतर सेवानिवृत्तीचा कार्यक्रम उरकून सांगोला येथे येण्यासाठी बस मध्ये सायंकाळी पाचच्या सुमारास सांगोला बस स्टेशन वरून उतरून चालत चालत चालत येत असताना राहत्या घरी आली व उजव्या हातातील सोन्याची पाटली नसल्याचे दिसून आले म्हणून चालत चाललेल्या रोडवरून मिथुन तिथून शोधाशोध करत पण ते मिळाले नाही तेव्हा त्यांच्या निदर्शनास आले की सांगोला एसटी बस स्टॅन्ड मधून उतरत असताना हातातील सोन्याची पाटली कट करून चोरून नेले असले की त्यांच्या लक्षात आली. त्याचप्रमाणे सांगोला शहरातील राहणाऱ्या सिंदूर रामचंद्र भोकरे राहणार सांगोला भारत गल्ली यांचे दिनांक तीन रोजी २०२५ रोजी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास एसटी बस मध्ये चढत असताना उजव्या हातातील दोन तोळे वजनाची पाटली कट करून चोराने नेल्याची फिर्यादीत नमूद केली आहे.

# तळा तालुका घाटकोपर विभाग यांच्यातर्फे आमदार तुकाराम काते यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : रविवार दि.१ जून २०२५ रोजी तळा तालुका घाटकोपर विभाग यांच्यातर्फे रायगड तळा तालुक्याचे सुपुत्र आणि मुंबई चेंबूर चे आमदार तुकाराम काते यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.या सत्कार सोहळ्याला तालुक्यातील घाटकोपर मुंबईस्थित रहिवाशी यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.घाटकोपर विभागातील ग्रामस्थ वनस्ते बेलघर राणेची वाडी तळेगाव ऊसर चोरीवली माजगाव वाशी महागाव बार्पे




पुसाटी अशा अनेक गावातील रहिवाशी या सत्कार सोहळ्याला उपस्थित होते.यावेळी आमदार तुकाराम काते यांनी या सत्कार सोहळ्याला संबोधित केले. आणि जाहिरपणे सांगितले की मी आपल्याच गावचा आहे. आणि तुमच्या पाठीशी असेन.या सत्कार सोहळ्याचे आयोजन घाटकोपर पश्चिम शिवसेना उपविभाग प्रमुख हरेश (अण्णा) धांद्रूत यांनी केले होते.

**छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिन कार्यक्रम....** **कौशल विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते उद्योजक झालेल्या आयटीआय च्या विद्यार्थ्यांचा सत्कार**

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्श विचारांचा सर्वांनी अंगीकार करावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, दिनांक ६(जिमाका):- आज सर्वत्र छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन सोहळा मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा केला जात आहे. महाराजांनी लोक कल्याणकारी आदर्शवत अशी राज्यकारभार पद्धत राबवली. त्याच पद्धतीच्या अवलंब करून आपले राज्य शासनही राज्यकारभार करत आहे. समाजातील प्रत्येक विद्यार्थी, नागरिक व पालक यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा व आदर्शांचा आपल्या जीवनात अंगीकार करावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केले.

जिल्हा व्यवसाय शिक्षण कार्यालय





व महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आयोजित शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रमात किल्ले विकास मंत्री श्री. लोढा मार्गदर्शन करत होते. यावेळी कौशल विकास विभागाचे मुंबई येथील सहसंचालक अनिल जाधव, पुणे येथील उपसंचालक चंद्रशेखर ढाकणे, जिल्हा व्यवसाय प्रशिक्षण अधिकारी सुरेश भालचीम, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य विनायक झुटे, मित्राचे अधिकारी पंकज जयस्वाल यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी श्री. लोढा म्हणाले की, शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी नोकरी किंवा उद्योग या दोन्ही पर्यायाचा विचार केला पाहिजे. स्वतःचे उद्योग उभारून त्या उद्योगातून इतरांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. मित्रा या संस्थेच्या माध्यमातून रोजगाराची संधी उपलब्ध केली जात आहे, असल्याचेही त्यांनी सांगितले.

कौशल्य विकास विभागाच्या न्यू एज कोर्सेसच्या माध्यमातून रोबोटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, थ्रीडी प्रिंटिंग, इलेक्ट्रिक वेहिकल साठी ईव्ही टेक्निशियन, सोलर टेक्निशियन हे कोर्सेस जुलै महिन्यापासून सुरू होत आहेत. या कोर्सेस द्वारे भविष्यामध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. तरी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत नव्याने प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी या नवीन अभ्यासक्रमात प्रवेश घ्यावा असेही आवाहन कौशल्य विकास मंत्री श्री लोढा यांनी केले.

प्रारंभी कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते राज्यभिषेक दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच त्यांनी यावेळी महाराजांना वंदन केले.

उद्योजकांचा सत्कार –

विकास मंत्री श्री लोढा यांच्या हस्ते आयटीआय संस्थेमार्फत जे विद्यार्थी उद्योजक झालेले आहेत त्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये... १)रवींद्र बगले मल्टिपल बिझनेस, २)लक्ष्मण राजाराम श्रीमल इलेक्ट्रिक मेकॅनिकल हे सर्वो शाईन सर्विसेस येथे काम करतात. ३)विष्णू थेटे हे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून काम पाहतात. ४)जसपाल सिंग तैयावाले रेल्वेमध्ये कॉन्ट्रॅक्टर पदावर कार्यरत आहेत. ५) प्रकाश तैयावाले राधा इंटरप्राईजेस यांचा देखील सत्कार करण्यात आला. त्यानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.